# मेंदूतील धोकादायक रक्तस्त्राव आणि होमिओपॅथीक उपचार

Intracranial Hemorrhage म्हणजे मेंदूमध्ये रक्तस्त्राव होणे. मेंदूतील रक्तस्त्राव हा एक आणीबाणीचा आजार आहे. कारण मस्तिष्कात रक्तस्त्राव वाढतच राहिला तर मेंदूतील दबाव वाढत जातो. ज्यामुळे मेंदूपेशी मृत पावतात आणि रक्तपुरवठा खंडीत होतो. अतिप्रसंगात मेंदू बाहेर येऊ शकतो अशावेळी तत्काळ मेंदूचा सीटी स्कॅन करून अचूक निदान करतात.

मेंदू हा महत्त्वाचा अवयव तीन आवरणांनी आच्छादलेला असतो. ज्याला मस्तिष्कआवरण असे म्हणतात आणि बाहेरच्या बाजूने कवटीने आच्छादलेला असतो. जेव्हा मस्तिश्कात रक्तस्त्राव होतो. त्यावेळेस मेंदूपेशींवर ताण येऊन त्या सुजतात. परिणामी मेंदूला सूज येते. रक्तस्त्राव झालेल्या भागाचा एक गोळा बनतो. ज्याला हिमॅटोमा असे म्हणतात. आजकालच्या प्रचलित मेडिकल सायन्सप्रमाणे अशा स्वरूपाच्या आजारावर तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला जातो.

**कारणे :-** १. डोक्याला झालेला अपघात हे तरूणांमध्ये आढळणारे मेंदूतील रक्तस्त्रावाचे महत्त्वाचे कारण आहे. २. उच्च रक्तदाब - अनियमित उच्च रक्तदाबामुळे रक्तवाहिन्या कमकुवत होऊन सततच्या अनियंत्रित रक्तदाबामुळे अचानक मेंदूत रक्तस्त्राव होऊ शकतो. 3. मेंदूतील रक्तवाहिन्यांना आलेला फुगवटा ॲन्युरिझम अचानक फुटून रक्तस्त्राव होऊ षकतो. यामुळे पक्षाघात होऊ षकतो. ४. रक्तवाहिन्यांमधील जन्मतःच असलेल्या विकृतिमुळे निर्माण होणारा रक्तवाहिन्यातील कमकुवतपणा ५. वाढत्या वयानुसार होणारे धमन्यांचे आजार ज्यामुळे वाढणारा रक्तदाब हे एक महत्त्वाचे मेंदूरक्तस्त्रवाचे कारण उतारवयातील रूग्णांमध्ये दिसून येते. उच्च रक्तदाबामुळे नकळत थोडा थोडा रक्तस्त्राव मेंदूमध्ये होत राहतो. ६. रक्तस्त्रावाचे आजार जसे की, हिमोफिलीया, सिकल सेल अनेमिआ तसेच प्लेटलेटचे आजार यामुळेही मेंदूत रक्तस्त्राव होऊ षकतो. ७. यकृताचे आजार ८. मेंदूतील टयूमर इत्यादी.

**वर्गीकरण :-** इन्ट्राॲक्शीअल रक्तस्त्राव - यामध्ये मेंदूपेशींमध्ये रक्तस्त्राव होतो. किंवा मेंदूतील पोकळ्यांमध्ये व्हेंट्रीकल्स रक्तस्त्राव होतो. असा मेंदूच्या आतील रक्तस्त्राव सर्वात जास्त धोकादायक असतो.

**एक्स्ट्राॲक्शीअल रक्तस्त्राव** - यामध्ये रक्तस्त्राव मेंदूच्याबाहेर पण कवटीच्या आत होतो. याचे तीन प्रकार पुढीलप्रमाणे - १. इपिडयुरल रक्तस्त्राव - यामध्ये रक्तस्त्राव बाह्य मस्तिष्क आवरण आणि कवटी यांच्यामध्ये होतो. महत्वाच्या मस्तिष्क धमणीला इजा झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होऊन मस्तिष्काच्या आतील दबाव झपाट्याने वाढतो. परिणामी रूग्ण बेशुद्ध होतो. २. सबड्युरल रक्तस्त्राव- बाह्य आणि मध्य मस्तिष्क आवरणामधील रोहिण्या फाटल्यामुळे असा रक्तस्त्राव होतो. ३. सबॲरकनॉईड रक्तस्त्राव - मध्य आणि अंतस्थ मस्तिष्क आवरणामध्ये रक्तस्त्राव होतो. याचे कारण म्हणजे धमनीला आलेला फुगवटा फुटणे, धमणी आणि रोहिन्यांमधील विकृती हे होय.

**लक्षणे :-** मेंदूतील रक्तस्त्रावाची लक्षणे किती प्रमाणात रक्तस्त्राव झालाय, मेंदूच्या कुठल्या भागात झालाय यावर अवलंबून असतात.

१. अचानक खूप प्रमाणात डोकेदुखी सुरू होणे.
२. अचानक फिट येणे.
३. कुठल्याही हातापायात अशक्तपणा जाणवू लागतो.
४. उलटी किंवा मळमळ होणे.
५. अशक्तपणा येऊन सजगता कमी होऊ लागते.
६. काही लोकांमध्ये दृष्टीमध्ये अडथळे निर्माण होतात. आदी.




**मेंदुला झालेल्या दुखापतीचे परिणाम :-**
१. चेतनाशक्तीवर झालेला दुष्परिणाम - मुर्च्छित अवस्था - यामध्ये पेषंट बेशुद्ध अवस्थेत जातो. पण शारिरिक हालचाली बंद असतात. कोमाची अवस्था यामध्ये रूग्ण पूर्णपणे बेशुद्ध अवस्थेत असतो. कुठल्याही दाहक उद्दिपणामुळे तो जागा होत नाही. काही लोक जागृत असतात. परंतु सभोवतालच्या घटनांबद्दल त्यांना काहीच समझत नाही. काहींमध्ये सजगता असते परंतु ते पॅरालिसिसमुळे हिंडूफिरू शकत नाही किंवा इतर कोणाशी बोलू शकत नाहीत. २. बोधात्मक त्रुटी - मेंदूदुखापतीनंतर काही लोकांना दैनंदिन गोष्टींमध्ये आकलन करणे, एकाचवेळी अनेक गोष्टी हाताळणे, समस्यांचे निराकरण करण्यात अडथळा येतो. काहींमध्ये स्मृतिभंश होतो. असा स्मृतिभंश नुकत्याच झालेल्या किंवा पुरातन गोष्टींच्या बाबतीत असू शकतो. ३. बोलण्यातील आणि संभाषणातील त्रुटी - बोलताना शब्द पटकन न आठवणे किंवा अडखळत बोलणे. ४. दिसणे, ऐकणे, वास समजणे, चव समजणे यातही तक्रारी जाणवू शकतात. ५. भावनिक आणि वागणूकीतील बदल - पटकन चिडणे, ओरडणे, डिप्रेशन येणे, वेड लागल्यासारखे वागणे, अनावश्यक भिती वाटणे अशा तक्रारी जाणवतात आदी.

**केस : -** ही एक ३८ वर्षाच्या पुरूषाची केस आहे. जे अचानक मेंदूतील रक्तस्त्रावामुळे बेशुद्ध झाले आणि त्यांना तत्काळ आय.सी.यू मध्ये ॲडमिट करण्यात आले. मेंदूतील महत्त्वाच्या भागात रक्तस्त्राव झाल्यामुळे त्यांना त्यातून वाचवणे अवघड असल्याचे डॉक्टरांनी सांगितलेले होते. रूग्णाला कृत्रिम श्वासोच्छवासावर ठेवण्यात आले होते. मेंदूच्या सी. टी स्कॅन तपासणीमध्ये मेंदूमध्ये १.८ * १.३ से.मी. एवढा रक्तस्त्राव छोट्या मेंदूच्या भागात झालेला आढळून आला.

**तक्रारी :-** १. रूग्ण तीन दिवसांपासून बेशुद्धावस्थेत होता. सुरूवातीला रूग्णाला अचानक चक्कर आली आणि त्यांचे प्रचंड डोके दुखू लागले व उलट्या होऊ लागल्या. उजवा हात उचलता येत नव्हता, रूग्णाला बोलता येत नव्हते, जीभ जड पडू लागली. दोन तासांनी रूग्णाला फिट्स येऊ लागल्या आणि रूग्ण बेशुद्ध झाला.

**विशेष माहिती :-** १. खाण्यात दुधाची फळांची आवड. तिखट पदार्थामुळे पित्ताच्या तक्रारी. २. जुनाट डोकेदुखीचा त्रास ५ ते ६ वर्षांपासून. ३. जुनाट सर्दीचा, बद्धकोश्ठातेचा त्रास. ४. खूप कमी प्रमाणात घाम येणे. ५. कुशीवर झोपण्याची, झोपेत बोलण्याची सवय. ६. थंड प्रकृती.

**स्वभाव :-** त्यांच्या स्वभावाविषयीची माहिती मित्रांनी व पत्नीने दिली.

त्यांच्या लहानपणाविषयी सांगा. - लहानपणी तो खूप बोलक्या स्वभावाचा होता. त्याला कायम लोकांबरोबर राहायला आवडायचे. तो खूप खेळकर पण कष्टाळू होता.

त्यांच्या स्वभावाविशयी सांगा. - तो खूप शांत स्वभावाचा एक उत्तम चांगला शिक्षक आहे. नुकताच त्याने सर्वोत्तम शिक्षकाचा पुरस्कार मिळवला. शाळेत तो सगळ्या विद्यार्थ्यांचा आवडता शिक्षक आहे. कामाच्याबाबतीत तो खूप दक्ष आणि प्रामाणिक आहे. प्रत्येक काम वेळेतच झाले पाहिजे. असा त्याचा अट्टाहास असतो. प्रत्येकाला मदत करण्याची त्याची भावना असते. तो कधीच कोणाला दुखवत नाही. सतत काहीना काहीतरी करतच राहायला त्याला आवडते. स्वच्छ, टापटिप राहणे त्याला आवडते. पॉलिटिक्समध्ये तो सहभाग घेतो. आत्ताच त्याने पदव्युत्तर पदवी मिळवली तरी त्याला अजून पुढचे शिक्षण घ्यायचे आहे. पण तो मनातल्या गोष्टी कोणाशीच शेअर करत नाही.

**संपूर्ण व्यक्तीमत्त्व :-** १. महत्त्वाकांक्षी २. उद्यमशिलता ३. सामाजिक कार्याची आवड ४. कौटुंबिक आवड ५. मदत करण्याची आवड ६. कनवाळू ७. धाडसी ८. मेहनती स्वभाव ९. धार्मिक १०. मेंदूतील अतिरिक्त रक्तस्त्राव ११. दुधाची आवड १२ थंड प्रकृती

**परातीसाद :-** वरील लक्षणांवरून रूग्णाला होमिओपॅथीक औशध आय. सी. यू मध्येच चालू केले. तिसऱ्या दिवशी रूग्णाच्या मित्रांनी सांगितले की, मी रूग्णांची पापणी उघडत असताना पेशंटचे डोळे उघडेच राहिले, हातापायात हालचाली जाणवू लागल्या. कृत्रिम श्वासोच्छवासाच्या यंत्रणेतसुद्धा बदल करण्यात आला. डाव्या हाताच्या हालचाली जाणवू लागल्या. एका महिन्यानंतर रूग्ण पातळ पदार्थ खाऊ लागला. काही महिन्यांनी रूग्ण बोलण्याचा प्रयत्न करू लागला. शारिरिक हालचाली सुधारू लागल्या. होमिओपॅथीमुळे रूग्णाला जीवनदान मिळाले आणि मेंदूवरची मोठी शस्त्रक्रिया टळली.


आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल,
तपोवन मंदिर रोड, मोर मॉलच्या समोर,
पिंपरी गाव, पुणे -१७
फोन नंबर - ०२०-२७४१२१९७/२७४१२५४९



| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८९ | -------,,--------- | १३४ | ९९.७४ चौ. फूट प्रती गाळा | १२,०१,८६७/- प्रती गाळा | १२,०१९/- प्रती गाळा | निविदा नंतर संपूर्ण लीज रक्कम अगाऊ (विनापरतावा) | ३० वर्षे | १५००/- प्रति गाळा | महिला साठी राखीव |
| ९० | -------,,--------- | १३५ | ९९.७४ चौ. फूट प्रती गाळा | १२,०१,८६७/- प्रती गाळा | १२,०१९/- प्रती गाळा | निविदा नंतर संपूर्ण लीज रक्कम अगाऊ (विनापरतावा) | ३० वर्षे | १५००/- प्रति गाळा | महिला साठी राखीव |
| ९१ | -------,,--------- | १३६ | ९९.७४ चौ. फूट प्रती गाळा | १२,०१,८६७/- प्रती गाळा | १२,०१९/- प्रती गाळा | निविदा नंतर संपूर्ण लीज रक्कम अगाऊ (विनापरतावा) | ३० वर्षे | १५००/- प्रति गाळा | महिला साठी राखीव |
| ९२ | -------,,--------- | १३७ | ९९.७४ चौ. फूट प्रती गाळा | १२,०१,८६७/- प्रती गाळा | १२,०१९/- प्रती गाळा | निविदा नंतर संपूर्ण लीज रक्कम अगाऊ (विनापरतावा) | ३० वर्षे | १५००/- प्रति गाळा | |
| ९३ | -------,,--------- | १३८ | ९९.७४ चौ. फूट प्रती गाळा | १२,०१,८६७/- प्रती गाळा | १२,०१९/- प्रती गाळा | निविदा नंतर संपूर्ण लीज रक्कम अगाऊ (विनापरतावा) | ३० वर्षे | १५००/- प्रति गाळा | |
| ९४ | -------,,--------- | १३९ | ९९.७४ चौ. फूट प्रती गाळा | १२,०१,८६७/- प्रती गाळा | १२,०१९/- प्रती गाळा | निविदा नंतर संपूर्ण लीज रक्कम अगाऊ (विनापरतावा) | ३० वर्षे | १५००/- प्रति गाळा | |
| ९५ | -------,,--------- | १४० | ९९.७४ चौ. फूट प्रती गाळा | १२,०१,८६७/- प्रती गाळा | १२,०१९/- प्रती गाळा | निविदा नंतर संपूर्ण लीज रक्कम अगाऊ (विनापरतावा) | ३० वर्षे | १५००/- प्रति गाळा | |
| ९६ | -------,,--------- | १४६ | ९९.७४ चौ. फूट प्रती गाळा | १२,०१,८६७/- प्रती गाळा | १२,०१९/- प्रती गाळा | निविदा नंतर संपूर्ण लीज रक्कम अगाऊ (विनापरतावा) | ३० वर्षे | १५००/- प्रति गाळा | |
| | एकूण | ९६ | | | | | | | |

सदरची निविदेतील, मिळकतीचा तपशील अनामत, बयाणा रक्कम, नियम अटी, शर्ती, इ. माहिती मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदरची निविदा ई-टेन्डरिंग पद्धतीने मनपाचे वेबसाईटवरून भरावयाची आहे. याकामी मनपाच्या अतिरिक्त आयुक्त कार्यालयात इच्छुकांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीबाबतची सविस्तर माहिती अतिरिक्त आयुक्त कक्षामध्ये मिळेल. सदरची ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा दि. २१/१०/२०१५ ते दि. १६/११/२०१५ अखेर दु. ३.०० वाजेपर्यंत ई-टेन्डरींग पद्धतीने मनपाचे वेबसाईटवरूनच भरता येईल. ज्या व्यक्ती/संस्था ई-टेडरींग प्रक्रिया अंतर्गत नोंदणी करतील त्यांनाच Digital Key देण्यात येणार आहे. त्यांनाच निविदा भरता येईल संबंधितांनी निविदेची फार्म फी, बयाणा रक्कम मनपाचे खात्यात पेमेंट गेटवे सिस्टीमद्वारे भरावयाची आहे. आवश्यक ज्यादा कागदपत्रे द्यावयाची असलेस ई-निविदेसोबत स्कॅन करून व सत्यप्रत करून अपलोड करता येईल. कोणतेही कारण न देता निविदा पुर्णत: किंवा अंशत: मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार मा. आयुक्त यांनी राखून ठेवला आहे. सदर ऑनलाईन निविदा www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावरूनच भरता येईल.

जाहिरात क्रमांक-३६०
भूमि आणि जिंदगी विभाग
क्र.भूजि/२/कावि/३१७/२०१५
दि. १५/१०/२०१५

सही/-
**आयुक्त**
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८


# डेंग्यू निवारणासाठी विशेष मोहीम

**पुणे : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून डेंग्यूच्या रुग्णांत वाढ होत आहे. डेंग्यूच्या रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता राज्याच्या आरोग्य विभागाने या आजाराच्या निर्मूलनासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेंतर्गत '९ दिवस ९ योजना' हा नवीन उपक्रम राबविण्यात आला आहे, अशी माहिती राज्य आरोग्य उपसंचालक डॉ. कांचन जगताप यांनी दिली.

दिवसागणिक राज्यातील, तसेच पुण्यातील डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर नवरात्रात विशेष मोहीम राबविण्यात येत असल्याचे डॉ. जगताप यांनी सांगितले. नवरात्रासारख्या सणाच्या दरम्यान संसर्गजन्य आजार पसरण्याची आणि रुग्णांमध्ये वाढ होण्याची शक्यता जास्त असते. असे होऊ नये आणि नागरिकांत जनजागृती निर्माण व्हावी यासाठी ही मोहीम राबविण्यात येत असल्याचे त्या म्हणाल्या. याच पार्श्वभूमीवर डेंग्यू नियंत्रणाखाली येण्यासाठी '९ दिवस ९ योजना' हा नवीन उपक्रम राबविण्यात आला आहे. याअंतर्गत शहराबरोबरच ग्रामीण भागातील स्वच्छता मोहीम, विविध ठिकाणी असणाऱ्या कंटेनरचे सर्वेक्षण करणे, डास सापडतील त्या ठिकाणी ते नष्ट होण्यासाठी विविध उपाययोजना, शाळा-महाविद्यालयांमध्ये जनजागृतीपर कार्यक्रम असे विविध कार्यक्रम राबवावेत, अशा राज्यातील सर्व जिल्ह्यांना सूचना दिल्या आहेत.

> **रुग्णांची संख्या गेल्या वर्षीपेक्षा कमी आहे असे सांगितले जात असले तरीही काही महिन्यांत रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. पुण्यात जुलैमध्ये ७५, ऑगस्टमध्ये १५६, तर सप्टेंबरमध्ये २९० रुग्णांना डेंग्यूची लागण झाली. १६ ऑक्टोबरपर्यंत १९९ जणांना या आजाराचा सामना करावा लागला आहे. डेंग्यूच्या निर्मूलनासाठी उपक्रम राबविण्यात येत आहेत. तरीही प्रत्येकाने वैयक्तिक स्वच्छता ठेवणे गरजेचे आहे. प्रत्येक नागरिक जबाबदारीने वागला तर हा आजार आटोक्यात आणण्यात यश मिळू शकेल.** - **डॉ. कांचन जगताप**

## 'स्तनांचा कर्करोग' विषयावर मार्गदर्शन

**पुणे** : जागतिक स्वास्थ्य संघटनेतर्फे ऑक्टोबर महिना हा 'ब्रेस्ट कॅन्सर जागृती' महिना म्हणून घोषित करण्यात आला आहे. सह्याद्री स्पेशालिटी हॉस्पिटलने यासंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी २३ ऑक्टोबर रोजी कोहिनूर हॉल, प्रभात रोड येथे सायं. ५ ते ७ या वेळेत चर्चासत्राचे आयोजन केले आहे. यात सह्याद्री हॉस्पिटल्सचे प्रख्यात कर्करोगतज्ज्ञ डॉ. तुषार पाटील, डॉ. विनोद गोरे व डॉ. सुमीत शाह यावेळी 'स्तनांचा कर्करोग कसा टाळावा' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

कर्करोग ओळखण्याची लक्षणे म्हणजे, स्तनातील गाठ वा स्तन घट्ट होणे, स्तनात सतत दुखणे, एक स्तन मोठा होणे एक जरी लक्षण दिसत असेल तर संवाद साधणे अत्यावश्यक आहे. चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी ७७६८००३७७७ वर संपर्क साधावा. हे चर्चासत्र सर्वांसाठी मोफत आहे.

## डेंग्यू प्रश्नावरून नगरसेवकांनी प्रशासनाला धरले धारेवर

**पुणे : प्रतिनिधी**

डेंग्यूचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिका यंत्रणा सज्ज झाली असून, आतापर्यंत २६०० केसेस दाखल करण्यात आल्या आहेत. तसेच आतापर्यंत एक लाख साठ हजारांचा दंड वसूल करण्यात आल्याची माहिती पुणे महानगरपालिकेचे आरोग्यप्रमुख एस. टी. परदेशी यांनी सभागृहात दिली आहे. डेंग्यू प्रश्नावरून पुन्हा प्रशासनाला धारेवर धरण्याचे काम नगरसेवकांनी सभेत केले. सभेच्या अध्यक्षस्थानी महापौर दत्ता धनकवडे होते.

डेंग्यूचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी पालिका प्रशासनाने सर्वसामान्य नागरिक, खासगी कार्यालयांसह महापालिकेच्या सर्व कार्यालयांनाही 'लक्ष्य' केले होते. असे असताना डेंग्यूने चारजणांचा मृत्यू झाल्याचे रिपाइंचे गटनेते डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी तातडीचा मुद्दा म्हणून सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी नगरसेवक किशोर शिंदे, नंदा लोणकर, सुभाष जगताप यांनी प्रशासनावर टीका करताना केसेस दाखल करण्याऐवजी आता फौजदारी दाखल करण्याचा आग्रह धरला. तसेच डेंगीबाबत प्रशासन गलथानपणा करीत असल्याचा आरोपही करण्यात आला. यावर खुलासा करताना परदेशी म्हणाले, डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून महापालिकेतर्फे विशेष मोहीम राबवण्यात येत आहे.

मंगळवार, २० ऑक्टोबर २०१५ पुण्य नगरी
वृत्तवेध
## शब्दखेळ



### आडवे शब्द
१. केंद्रीय कॅबिनेट मंत्रीपद भूषविणाऱ्या पहिल्या भारतीय महिला
९. जेट विमान चालविणाऱ्या पहिल्या भारतीय महिला कॅप्टन **** देशमुख
१२. सगळीकडे पाणीच पाणी होणे, पाण्याने सर्व जागा व्यापणे
१३. शोध, तपास, वस्त्र विणण्याचे यंत्र
१४. एक आणि पाव मिळून होणारी संख्या
१५. ताणला जाणारा एक लवचीक पदार्थ
१६. कैफी, अंमली, नशिला
१७. सूर्याचे एक नाव
१८. मूल्य, किंमत, भक्ती, निष्ठा
१९. वडाचे झाड, दादागिरी
२१. नवऱ्याचा भाऊ
२२. एक धान्य, सातू, जव
२४. झाडाचे पर्ण, दल
२५. आशुतोष राणाची अभिनेत्री पत्नी (नाव)
२६. टोकियो राजधानी असलेला उगवत्या सूर्याचा देश
२८. सलीमची प्रेयसी
३०. पाषाण, कातळ, मोठा दगड
३१. राक्षस, असुर, दैत्य
३२. बावन्न पत्त्यांचा एक खेळ मेंडी **
३३. दोन डोंगरांमधील खोलगट भाग, खोरे
३४. कठीण, कठोर, निबर
३५. पाणी, जल (संस्कृत)
३६. नावांची यादी, नामावली
३७. एक हिंदी अभिनेत्री *** टंडन
३८. म. गांधींचा गुजरातमधील आश्रम
४१. पंच, मध्यस्थ
४३. एक प्रसिद्ध सरबत ब्रॅंड
४४. नागपूरमधील एक औष्णिक वीजकेंद्र
४५. गुप्तदूत, जासूस
४६. सिंह (संस्कृत), एक जुने वर्तमानपत्र
४७. शर्टाचे बटण अडकविण्याचे भोक, खाच
४८. मराठी कवितेतील एक शब्दालंकार
५०. उस्ताद झाकिर हुसेन यांचे वाद्य
५२. हात, हस्त, टॅक्स
५३. पहारा, टेहळणी
५४. युक्ती, चातुर्य, चमत्कार
५६. राजबिंडा, सुकुमार, देखणा
५८. गिरनार कंपनीचा एक प्रसिद्ध चहा ब्रॅण्ड
६०. विश्व, सृष्टी, दुनिया
६२. फणसातील मगज
६४. एक नाटक ** कदाचित
६५. गायनातल्या कल्याण रागाचा विस्तार
६६. औंदा, यावर्षी
६७. क्रिकेटसाठी प्रसिद्ध असलेले दुबई जवळील एक शहर
६८. एक भारतीय क्रांतिकारक- ** गेनू
६९. बुद्धी, अक्कल, ज्ञानशक्ती
७०. रोख पैसे मिळवून देणारे पीक वगैरे
७२. श्रीकृष्णाने करंगळीवर उचललेला पर्वत
७३. पायाची खोट, जप्ती
७४. फिर्याद, हक्क, दुजोरा, दखल
७५. हिंदीत 'प्रश्न'
७६. तसला, त्या प्रकारचा
७७. इंग्रजीत 'जाळे'
७८. आजारी व्यक्तीस आपले रक्त दान करण्याची क्रिया
७९. एक दिवंगत हिंदी अभिनेत्री दिव्या ***
८०. एक हिंदी चरित्र अभिनेते *** निश्चल

### उभे शब्द
१. राजाची आई
२. पटकन, त्वरित, मेघ
३. सैन्याची मदत, सैन्यबल
४. दे ** धरणी ठाय
५. पुष्कळ, विपुल, वारेमाप
६. हरिणीसारखे डोळे असलेली
७. श्रीरामाची आई
८. गव्हाचे कणीदार पीठ, बारीक सांजा
९. एक माजी भारतीय क्रिकेटपटू- *** गांगुली
१०. ओझे, भार, दडपण, रूबाब
११. विजेत्याची थाटामाटात काढलेली शोभायात्रा
१७. 'जर' चा जोडीदार, होडी नौका
१८. स्मृती, शुद्ध, चैतन्य
२०. बांगलादेशाचे चलन
२१. गरीब, रंक, दुबळा
२३. रायगड जिल्ह्यातील महड येथील प्रसिद्ध गणपती
२४. बल्लाळेश्वर गणपतीचे रायगड जिल्ह्यातील ठिकाण
२५. एक मराठी अभिनेत्री क्रांती ****
२६. स्वतंत्र भारताचे पहिले सरसेनापती
२७. मनी नाही भाव देवा मला **
२८. शर्त, नियम, करार
२९. करिश्मा कपूरची अभिनेत्री बहीण
३०. ओबडधोबड, तुळतुळीत नसलेले
३१. दानशूर, दानवीर
३२. केरळ राज्यातील एक बंदर
३४. मुबई-नाशिक मार्गावरील एक घाट
३६. एक हिंदी अभिनेता सोनू **
३७. फळातील द्राव, रुची, स्वाद
३९. श्रीलंकेचा एक विद्यमान क्रिकेट फलंदाज
४०. बाण, शर, काठ, किनारा
४२. पंढरपूरची नियमित खेप, यात्रा
४३. रौप्यमोत्सव (हिंदी)
४४. रतांब्याचे साल, आमसूल
४६. वाढदिवसाला कापतात तो मैद्याचा गोड पदार्थ
४७. खायला ** भुईला भार
४९. महाराष्ट्राची मातृभाषा
५१. भला, चांगला, योग्य
५३. जतन, सांभाळणे, पाळणे
५५. बिनवासाचे एक पांढरे फूल
५७. नित्य, नेहमी, सतत
५९. मृत्यूदेवता
६१. हनुमानाचे शस्त्र
६३. 'असला नवरा नको गं बाई', 'अवघाचि संसार' या चित्रपटांचे मुख्य अभिनेते
६७. लग्न, विवाह (हिंदी)
६८. पादत्राणे बनविणारी भारतातील एक कंपनी
६९. रतीचा पती, कामदेव
७०. पलंग विणण्याची सुती पट्टी
७१. चूक, दोष (हिंदी)
७२अ नटणारा, मुरडणारा, नट्टापट्टा करणारा
७४. एक दिवंगत मराठी अभिनेते ** कोंडके
७५. बैठक, दरबार, मिटिंग
७६. शरीर, देह, काया

### कालच्या वृत्तवेध शब्दखेळचे उत्तर



## आपलं व्यासपीठ

### रस्ता मोकळा तर श्वास मोकळा



लोणी काळभोर हे हवेली तालुक्यातील पुणे-सोलापूर रस्त्यावरील मोठी लोकसंख्या असलेले गाव या गावाशेजारी थेऊर , कुंजीरवाडी, नायगाव, सोरतापवाडी, फुरसुंगी, म्हातोबाची आळंदी, उरुळी कांचन अशी गावे आहेत. गावाजवळ मराठीशाळा, हायस्कूल, महाविद्यालय, एमआयटी, तसेच विविध कंपन्या, कारखाने अशा सुविधा आहेत. त्यामुळे गावात नेहमीच वर्दळ चालू असते. गावामध्ये मुख्य पोलिस स्टेशन हे सर्व गावांचे प्रमुख केंद्र आहे. यामुळे पोलिस स्टेशनमध्ये येणाऱ्यांची संख्या जास्त आहे. तसेच शेजारी प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. पोलिस स्टेशन समोर ग्रामपंचायतीचे व्यावसायिक गाळे आहेत. यामुळे लोणी काळभोर गावामध्ये मुख्य रस्त्यावर नेहमीच गर्दी असते. या रस्त्यावर पायी चालणाऱ्या मुले-मुली, महिला-पुरुष यांना चालताना जीव मुठीत धरुन चालावे लागते. कारण पोलिस स्टेशन शेजारी व समोर चारचाकी दुचाकी पार्कींग केलेले असतात. यामुळे रस्ता अपुरा पडतो. तरी ग्रामपंचायत व लोणी पोलिस स्टेशन यांनी पार्कींग करिता पर्यायी व्यवस्था करावी. अशी अपेक्षा आहे. लोणी स्मशानभूमीसमोरील जागेमध्ये पार्कींगची व्यवस्था करावी. कारण शनिवारी आठवडे बाजार असतो या दिवशी रस्त्यावर चालणे म्हणजे मरणाला आमंत्रण आहे. रस्ता मोकळा असेल तरच मोकळा श्वास घेता येतो.

**- दिलीप शामराव भोसले**

**टीप :** आपल्या परिसरातील समस्यांबाबत आपली मते १०० ते १५० शब्दांत आपल्या छायाचित्रासह व पत्त्यासह खालील पत्त्यावर पाठवावीत.

पत्ता : दैनिक 'पुण्य नगरी' बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे - ५. Email : ambika.pune@gmail.com